सातारा, गुरुवार, २६ जानेवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# दिल्लीमधील संचलनासाठी विजय भोसले याची निवड



**सातारा, ता. २५ :** दिल्ली येथे उद्या (गुरुवारी) प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या राजपथ संचलनासाठी रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा कॅडेट विजय भोसले याची निवड झाली आहे.

लेफ्टनंट प्रा. बाळकृष्ण भोसले यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. गेल्या तीन वर्षांपासून महाविद्यालयाच्या कॅडेटची या संचालनासाठी निवड होत असल्याने महाविद्यालयाची यंदा हॅट्ट्रिक झाली आहे. भोसले याचे डॉ. अनिल पाटील, डॉ. गणेश ठाकूर, डॉ. डी. डी. पाटील, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदींनी अभिनंदन केले.